# खरे सत्य न ओळखल्यानेच दुः ख अशांती निर्माण होते

ते परमसत्य काय आहे? ज्याला सर्व धर्मिय मानतात. पाच गोष्टी आपल्याला आठवत असतील. ज्या कसोटी म्हणून आपण वापरतो. सर्वधर्म मान्यता, सर्वोच्च, सर्वाच्या वर, सर्वज्ञानी, सर्वगुणांनी भरपूर जर आपण एक एक कसोटी मान्यता पहायला गेलो तर आवश्य सत्यापर्यंत पोहचू कारण आज मानवाने जवेढे सत्यापर्यंत जाण्याचा प्रयत्न केला तेवढा तो त्यापासून दूर गेला आणि जीवनात दुः ख अशांती वाढत गेली. सत्यापासून खूप दूर अंधारात आपण आलेलो आहोत.

सर्वात पहिले म्हणतो 'निसर्ग देव आह', तेव्हा निसर्गाला या पाच लागू होतात का? निसर्गाला सर्व धर्मिय परमात्म्याच्या स्वरुपात स्वीकारतात का? एकीकडे आपण म्हणतो परमात्मा रचनाकार आहे व निसर्गकत्याची रचना आहे. जर निसर्ग रचना असेल तर रचनाकार कसे होईल? दुसरी गोष्ट सृष्टीचा खेळ तीन सत्ता चालवितात. एक अनादि अविनाशी आत्मसत्ता , दुसरी परमात्मा सत्ता चालवितात. व तिसरी निसर्ग सत्ता. या तिन सत्ता अनादि अविनाशी आहेत. आत्मा आणि निसर्ग यात वेळोवेळी परिवर्तन होत असतात. परंतु त्याचा विनाश कधी होत नाही. व झालेला नाही. तर प्रकृती या खेळातील एक सत्ता आहे. परमात्मा वेगळी सत्ता आहे. दोन्ही वेगवेगळ्या सत्ता आहेत. दोन्ही एकच कश असू शकतील. दोन्ही सत्ता अनादी अविनाशी आहेत, दोघांचे वेगळे अस्तीत्व आहे. त्यामुळे निसर्गाला परमेश्वर समजले जाते. प्रत्यक्षात कोणत्याच धर्मात याला परमेश्वर म्हणून खूपच मान्यता कमी आहे.

दुसरे आपण मानतो आत्मा परमात्मा एकच आहे. हे कुठवर सत्य आहे? जसे आपण म्हणतो सागरातून बुडबुडा निघाला व सागरात समावला. तसे आपण परमात्म्याचा अंश या सृष्टीवर आलो परत शेवटी परमात्म्यात समावून जाऊ, काय हे सत्य आहे? कारण आत्मा आदी अनादी अविाशी आहे. परमात्म्यात सामावणे म्हणजे आत्म्याचे अस्तित्व नष्ट होणे. आत्म्याचे अस्तित्व मिटत नाही. आत्मा एक सत्ता आहे. सृष्टी ची सत्ता आहे. देवाच्या मंदिरात गेटवर म्हणतो तु माता-पिता आम्ही तुझी लेकरे, जर तो मात-पिता असेल, तर आपण परमात्मा कसे होऊ? जसे आपण जगात अभ्यास करुन एखादी पदवी घेऊ शकतो व अभ्यास करुन काहीही बनू शकतो. प्रत्यक्ष आपण आपला बाप बनू शकत नाही, बाप वेगळा अन्. मुलगा वेगळा असतो. हा दुसऱ्याचा बाप बनू शकतो परंतु स्वतः चा पिता होऊ शकत नाही. परंतु पित्यासमान बनू शकतो. त्याची गादी चालवू शकतो. त्याच्या छोट्या भावंडाचे पित्यासमान सांभाळ करु शकतो व संपत्तीच्या वाटपाच्या वेळीही छोटे भांवडे म्हणतात की, आपण आमच्या पित्यासमान आहात परंतु पिता नाही म्हणजे त्याला पित्याच्या रुपात स्वीकारु शकत नाही.

मनुष्य जसे कर्म करतो तसे त्याला संबोधन मिळते. नाव मिळते. कोणी दानपुण्य केले तर पुण्यात्मा, महान कार्य केले तर महात्मा, दिव्य कार्य केल्यास देवता, पाप केल्यास पापात्मा इत्यादी. पापात्मे, पुण्यात्मे देवात्मे अनेक आहेत, परंतु परमात्मा असा शब्द आहे ता कुठेही आढळत नाही तो एकमेव आहे, म्हणजेच आत्म्याचे अस्तित्व व परमात्म्याचे अस्तित्व वेगळे आहे. आत्मा परमात्मा बनेल असे होऊ शकत नाही. परमात्मा ही पदवी नाही जी कोणी धारण करु शकेल किंवा प्राप्त करु शकेल. आम्ही पित्यासमान बनू शकतो. परंतु पिता बनू शकत नाही. म्हणून आत्मा व परमात्मा एक आहे. असे म्हणने चूक आहे.

तिसरे आपण म्हणतो परमात्मा सर्वव्यापी आहे. कणाकणात आहे. ईश्वर आहे, असे कोणतेच स्थान-स्थळ नाही तेथे ईश्वर नाही. माझ्यात ईश्वर आहे, तुमच्यात ईश्वर आहे. आत्माही आहे, परमात्माही आहे. हे कोठवर सत्य आहे? तसे बघितले तर सर्वामध्ये ईश्वर आहे तर एक व्यक्ती दुसऱ्याचा खून करतो, दोन्ही ईश्वर आहेत तर हे कर्म कुणाचे? जर म्हणू हे कर्म आत्म्याचे, तर परमात्मा त्यावेळी निराळा साक्षी हातो. परंतु आहे त्याच्यातच, मग परमात्मा त्याच्यात असण्याला काहीच अर्थ उरत नाही? जर घरात लहान भावंडे भांडत असतील तर आईबाप समोर असलीत तर ते साक्षी होऊन पाहत बसत नाहीत. ताबडतोब भांडणे सोडवतील, का भांडत आहेत? काय पाहिजे? जे पाहिजे ते देतात. परंतु भांडू देत नाहीत. जर त्याचप्रमाणे जगातील प्रत्येक आत्मा जर परमात्म्याची लेकरे आहेत आणि भांडत आहेत. एकमेकांना मारत आहेत, वाईट कृत्य करत आहेत आणि परमात्मा त्यांच्याच बसला आहे. काहीच म्हणत नाही तो सर्वशक्तीमान आहे. त्याची शक्ती गेली कुठे? त्याच्यात जर एका आत्मा रोखण्याची ताकद नाही तर त्याला सर्वशक्तीमान कोण कसे म्हणावे, ज्याला दयासागर, करुणासागर, प्रेमसागर म्हणतात तर कोठे गेली त्याची दया, करुणा? त्याचे प्रेमसागरातले प्रेम गेले कुठे? त्याच्या आत्म्यात बसण्याचे कारण काय? तो आत्म्याला का रोखत नाही, त्याचा आत्म्यात बसण्याचा फायदा काय?

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com